मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेत भाजप एकहाती सत्तेमुळे बलवान

## पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुक 2026 : महायुतीतील समीकरणे बदलण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनीधी**

एकहाती सत्ता मिळाल्याने भाजप आणखी बलवान बनला आहे. दुसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादी (अजित पवार) आणि तिसऱ्या क्रमांकावर शिवसेना आहे. २०१७ च्या निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर या निवडणुकीत उतरू शकली नाही. इच्छुक-मनसाहेब मतदारांचे मन जिंकण्यात यश आले नाही. सत्तेपासून दूर असलेले राष्ट्रवादी आणि भाजप युतीतून बाहेर पडल्याने भाजपला फायदा झाला आहे.



फेररचना अद्याप बाकी असून महाविकास आघाडीला 'दयावान' अर्थात संधी मिळणार का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. भाजपला एकहाती सत्ता मिळाल्याने मविआत फूट पडण्याची शक्यता आहे. राज्यात आणि केंद्रात सत्तेत सहभागी असणाऱ्या राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाला विरोधी पक्षनेतेपद मिळेल. त्यामुळे महायुतीतील इतर पक्षांना सत्ताकारणात अडचण येईल का, असा प्रश्न आहे.

भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. दुसरीकडे राष्ट्रवादी चिन्हावर आणि पिंपरी व मतदारसंघात यश मिळालेल्या शिवसेनेचा आमदार महत्त्वाचा ठरू शकतो. राष्ट्रवादी (अजित पवार)ला विरोधी पक्षनेतेपद मिळेल. महायुतीतील इतर पक्षांना महापालिकेतील राजकारणात अडचणी राहणार आहेत. दुसरा बाब म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महापालिकेतील सत्तेचे राजकारण सांभाळताना भाजपची भूमिका महत्त्वाची ठरेल. शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार राष्ट्रवादी यांचीसुद्धा सत्तेतील जागा टिकून पुन्हा महापालिकेत सत्ता मिळवण्याची तयारी आहे.

स्थानिक नेतृत्वाचा प्रभाव अधिक आहे. पुणे शहरात स्थानिक नेतृत्वामुळे कायम राहणारे, शहरातील राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेना, भाजप, शरद पवार, अजित पवार, मोरे, पाटील, चव्हाण, शिंदे, ठाकरे, पाटील, बोदडे, तापकी अशी प्रमुख नावे आहेत. निवडणुकीच्या तोंडावर स्थानिक राजकारण हलले आहे.

# नागरिकांचा विश्वास सार्थ ठरविणार : आमदार शंकर जगताप

## पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपचा ऐतिहासिक विजय; पक्ष कार्यालयात जल्लोषाचा उत्साह

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीमध्ये शहरातील नागरिकांनी भाजपाला एक हाती कौल दिला. शहरातील नागरिकांना विकासाचे व्हिजन मान्य आहे. आगामी काळात नागरिकांचा हा विश्वास सार्थ ठरवणार असल्याचे निवडणूक प्रचार प्रमुख तथा आमदार शंकर जगताप यांनी सांगितले.



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने १२८ जागांपैकी ८५ जागांवर निर्विवाद बहुमत मिळवत दणदणीत विजय संपादन केला आहे. या विजयामुळे शहराच्या राजकीय इतिहासात भाजपने आपले वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले असून, पक्ष कार्यकर्ते व समर्थकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. या विजयाचा जल्लोष पिंपरीतील मोरवाडी येथील भाजप कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी साजरा केला. एकमेकांना पेढे भरवत या उत्साहात कार्यकर्ते सहभागी झाले.

यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, माजी प्राधिकरण अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, विजय फुगे आदि उपस्थित होते.

> लोकनेते लक्ष्मण भाऊ जगताप यांच्या निधनानंतर ही पहिलीच महापालिका निवडणूक होती. यामध्ये लक्ष्मण भाऊ जगताप यांची उणीव नक्कीच आम्हाला होती. मात्र त्यांनी दिलेले विचार आणि शहराचा विकास हेच अंतिम ध्येय मानून आम्ही काम केले. पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीचा विजय सुज्ञ मतदारांचा विजय आहे विकासाला विरोधाची झालर चढवण्याचा प्रयत्न झाला मात्र मतदारांनी तो खोडून काढला. मतदारांना शहराच्या विकासाचे महत्त्व समजलेले आहेत.
>
> – शंकर जगताप, आमदार

यावेळी आमदार शंकर जगताप म्हणाले, या निवडणुकीत भाजपने मांडलेले विकासाचे स्पष्ट व्हिजन, पायाभूत सुविधांचा विस्तार, सक्षम नागरी सुविधा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था आणि पारदर्शक प्रशासन यांना नागरिकांनी मोठ्या प्रमाणात पसंती दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. मतदारांनी विकासाला प्राधान्य देत भाजपच्या कामगिरीवर शिक्कामोर्तब केले आहे. हा विजय म्हणजे नागरिकांचा विश्वास असून, तो सार्थ ठरवण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही आमदार जगताप स्पष्ट केले.

यावेळी सर्वांनी शहरवासीयांचे आभार मानत, आगामी काळात पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी अधिक वेगाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# भाजपने राखला पिंपरी-चिंचवडचा गड

## अजित पवारांनी रान पेटवूनही राष्ट्रवादीला अपयश

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या गडावर भाजपने पुन्हा एकदा झेंडा रोवला. अत्यंत प्रतिष्ठेच्या दुरंगी लढतीत त्यांनी एकत्र आलेल्या दोन्ही राष्ट्रवादीला पाणी पाजले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपविरोधात रान पेटवूनही राष्ट्रवादीला यश मिळाले नाही. पवार यांनी केलेला भाजपच्या कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा निष्प्रभ ठरला. पालिकेतील १२८ पैकी तब्बल ८४ जागा भाजपने खिशात घातल्या. राष्ट्रवादीला ३७, शिंदेसेनेला ६ जागा मिळाल्या, तर एक अपक्ष निवडून आला.



पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक जाहीर झाल्यापासून उमेदवारी निश्चिती ते प्रचारापर्यंत भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) आघाडीवर होते. राष्ट्रवादी (अजित पवार)ने शरद पवार गटाशी हातमिळवणी केली होती. भाजपच्या मागील सत्ताकाळातील कथित भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून अजित पवारांनी भाजपला घेरले होते. मात्र, दुसरीकडे उमेदवारी जाहीर करण्याच्या तोंडावर २२ शिलेदारांनी पवारांची साथ सोडली. भाजपने शंभराचा आकडा गाठण्याचे उद्दिष्ट ठेवून मोर्चेबांधणी केली होती. त्यानुसार राष्ट्रवादी, शिंदेसेना व इतर पक्षांतील मोहरे फोडण्याचा सपाटा लावला. अजित पवार यांनीही तोच कित्ता गिरवत भाजपमधील काही नाराजांना उमेदवारी दिली. भाजप-राष्ट्रवादीने शिंदेसेनेशी युती करण्याबाबत मात्र शेवटपर्यंत 'सस्पेन्स' ठेवला. त्यामुळे बंडखोरीचे प्रमाण कमी झाले.

काँग्रेस, उद्धवसेना-मनसे, आप, वंचित बहुजन आघाडी, सनय छत्रपती शासन यांनीही उमेदवार उभे केले होते. मात्र, हे पक्ष नेस्तनाबूत झाले. भाजपच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, पंकजा मुंडे यांच्या सभा झाल्या, तर राष्ट्रवादीच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी (शरद पवार)चे खासदार डॉ. अमोल कोल्हे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, आमदार रोहित पवार यांच्या सभा झाल्या. शिंदेसेनेची खिंड खासदार श्रीरंग बारणे यांनी लढविली.

### दोन्ही राष्ट्रवादीत गोंधळ

» जागावाटपाबाबत चर्चेच्या फेऱ्या सुरू असताना राष्ट्रवादी (अजित पवार)च्या स्थानिक नेत्यांनी राष्ट्रवादी (शरद पवार)च्या नेत्यांना विश्वासात घेतले नाही. चर्चेचे गुऱ्हाळ लांबवले व अखेरीस अनेक प्रभागांमध्ये उमेदवार देत मैत्रीपूर्ण लढती केल्या. त्यामुळे दोन्ही गटांना फटका बसला.

### नेता एकटाच लढला!

» महापालिकेतील भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून अजित पवार एकटेच लढत होते, तर त्यांचे स्थानिक पातळीवरील शिलेदार तोंडावर बोट ठेवून होते. त्यामुळेही अपेक्षित यश मिळाले नाही. दुसरीकडे मागील वेळी ७७ वर असणारे भाजपचे संख्याबळ ८३ वर जाऊन पोहोचले. अजित पवारांच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांना उत्तर देण्यापेक्षा विकासाचा मुद्दा लावून धरल्याने अपेक्षित यश मिळवण्यात भाजपला यश मिळाले आहे.

### नितीन काळजे यांना सर्वाधिक मताधिक्य

» प्रभाग १९ मधील भाजपच्या जयश्री गावडे यांच्या विरोधात राष्ट्रवादीच्या सविता आसवाणी केवळ २१ मतांनी विजयी झाल्या, तर प्रभाग ३ मधून भाजपचे नितीन काळजे यांनी सर्वाधिक १९ हजार ६५३ मताधिक्य घेऊन राष्ट्रवादीच्या प्रकाश आल्हाट यांचा पराभव केला.

# नीलेश बारणे यांची हॅट्रिक, विश्वजीत बारणे यांची पहिली इनिंग..!

## प्रभाग 24 मध्ये बारणे बंधूंचे वर्चस्व कायम, मतदारांचा विश्वास पुन्हा सिद्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत प्रभाग २४ थेरगाव -दत्तनगरमधून शिवसेनेकडून निवडून येत बारणे बंधूंनी मोठा विजय मिळवला. नीलेश बारणे यांनी सलग तिसऱ्यांदा निवडून येत ट्रिक केली. शिवसेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे यांनी भाजपच्या माजी नगरसेवकाचा पराभव करत महापालिका सभागृहात प्रवेश केला. त्यांची ही पहिली इंनिग आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून प्रभाग २४ थेरगाव- दत्तनगर हा बारणे कुटुंबाचा बालेकिल्ला आहे. या प्रभागाचे हिरामण बारणे यांनी महापालिकेत प्रतिनिधित्व केले. त्यांनी स्थायी समितीचे अध्यक्षपद देखील भूषविले होते. मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पाचवेळा या प्रभागातून विजय मिळविला होता. श्रीरंग बारणे यांनीही स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेते, शिवसेना गटनेते अशी महापालिकेतील पदे भूषविली. खासदार बारणे यांचे पुतणे नीलेश हे तिसऱ्यांदा या प्रभागातून निवडून आले आहेत. त्यांनी भाजप पुरस्कृत अपक्ष उमेदवार गणेश गुजर यांचा पराभव केला. नीलेश यांची यंदाची तिसरी टर्म असून तिन्हीवेळा ते शिवसेनेकडून निवडून आले आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात युवा संघटन बळकट केल्यानंतर विश्वजीत बारणे यांनी पश्चिम महाराष्ट्राची जबाबदारी हाती घेतली. पश्चिम महाराष्ट्रात संघटना बांधणी मजबूत केली आहे. संघटनेतील कामकाजाच्या अनुभवानंतर विश्वजीत यांनी पहिल्यांदाच निवडणुकीच्या राजकारणात उडी घेतली. प्रभाग २४ मधून त्यांनी शिवसेनेकडून निवडणूक लढविली. त्यांनी प्रतिस्पर्धी असलेल्या माजी उपमहापौर झामाबाई बारणे यांचे पुत्र माजी नगरसेवक राहिलेल्या भाजपच्या सिद्धेश्वर बारणे यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. विश्वजीत यांनी आपल्या नगरसेवकपदाच्या पहिल्या इंनिगला सुरुवात केली. त्यांच्या रूपाने अभ्यासू, तरुण, शहरातील युवा पिढीच्या प्रश्नांची जाण असणारे नेतृत्व महापालिका सभागृहात आले आहे. तरुणांचा आवाज होणार असल्याचे विश्वजीत यांनी विजयानंतर सांगितले. हा विजय आपला नसून प्रभागातील सर्व नागरिकांचा असल्याचेही ते म्हणाले.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, प्रभाग २४ थेरगाव दत्तनगरममध्ये शिवसेनेचे नीलेश बारणे आणि विश्वजीत बारणे हे मोठ्या मताधिक्याने निवडून आले. नीलेश अनुभवी नगरसेवक आहे. विश्वजीत तरुण असून प्रभागाच्या विकासाचे 'व्हिजन' त्याच्याकडे आहे. दोघेही प्रभागाचा सर्वांगीण विकास करतील असा मला ठाम विश्वास आहे.

# पुण्यात शतप्रतिशत भाजप, 'राष्ट्रवादी'ला नाकारले

## गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार, भाजपवर उघडपणे केलेल्या टीकेला पुणेकरांनी प्रतिसाद न दिल्याने दोन्ही 'राष्ट्रवादी'च्या पदरी निराशा




**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आक्रमक प्रचार सुरू केला असताना, भाजपने त्यांना थोपविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवडणुकीच्या प्रचारासाठी रणांगणात उतरवले; तसेच प्रचाराच्या रणनीतीत बदल केल्याने भाजपने बहुमत मिळवित 'शतप्रतिशत' सत्ता मिळविली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी'ने एकत्र येत दिलेली लढत अपयशी ठरली. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार, भाजपवर उघडपणे केलेल्या टीकेला पुणेकरांनी प्रतिसाद न दिल्याने दोन्ही 'राष्ट्रवादी'च्या पदरी निराशा आली.

काँग्रेसने शिवसेना (ठाकरे) पक्षाबरोबर आघाडी केल्यावर शिवसेनेने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) बरोबर घेतल्याचा काँग्रेसला 'हात'भार लागला. मात्र, काँग्रेसने या दोन्ही पक्षांना 'हात' दाखवल्याने त्यांना यश मिळू शकले नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

भाजपबरोबर युती होणार, या विश्वासावर असलेल्या शिवसेना (शिंदे) पक्षाला ऐनवेळी उमेदवार उभे करावे लागल्याने या पक्षाच्या धनुष्याचे बाण भात्यातच राहिले. महापालिकेच्या १६५ जागांपैकी भाजपचे श्रीकांत जगताप आणि मंजुषा नागपुरे हे दोन जण बिनविरोध निवडून आले. उर्वरित जागांसाठी झालेल्या निवडणुकीत मतदारांनी भरभरून साथ दिल्याने भाजपने पुण्यावरील सत्ता कायम राखली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उमेदवार निश्चित झाल्यानंतर सलग दोन आठवडे पुण्यात ठाण मांडले होते. भाजपची उमेदवारी यादी जाहीर होताच त्यांनी भाजपमधील नाराजांना पक्षात घेऊन उमेदवारी देण्याची खेळी खेळली. त्यानंतर त्यांनी आक्रमकपणे प्रचाराला सुरुवात केली. भाजपच्या प्रचाराची जबाबदारी असलेले केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना त्यांनी लक्ष्य केले. त्यानंतर '७० हजार कोटींचा सिंचन घोटाळ्याचा आरोप करणाऱ्यांबरोबर सत्तेत आहे' असे वक्तव्य करून मतदारांना संभ्रमात पाडले. प्रचाराच्या अंतिम टप्प्यात मेट्रो आणि बससेवा मोफत देण्याची घोषणा करून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे निवडणुका जाहीर होण्यापूर्वी सोपी वाटणारी निवडणूक भाजपसाठी आव्हानात्मक झाली.

### गुन्हेगारांना उमेदवारी 'राष्ट्रवादी'ला भोवली

» राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन्ही 'राष्ट्रवादी'ने एकत्र निवडणुका लढविण्याचा निर्णय घेत भाजपपुढे आव्हान उभे केले. उमेदवारी देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील व्यक्तींनाही उमेदवारी दिली. त्यापैकी सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर या निवडून आल्या. कुख्यात गुंड गजानन मारणे याची पत्नी जयश्री आणि बापू नायर हे दोघे पराभूत झाले. हा निर्णय पुणेकरांच्या पचनी पडला नाही. त्यामुळे मतदारांनी 'राष्ट्रवादी'ला नाकारल्याने अपेक्षित यश मिळू शकले नाही. उपनगरांमध्ये या पक्षाचे पारंपरिक मतदार असल्याने त्या परिसरात मतदारांनी साथ दिली.

### भाजपला रणनीती बदलल्याचा फायदा

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आरोप, टीका-टिप्पणी सुरू केली असताना भाजपचे स्थानिक पदाधिकारी गोंधळात पडले. पवार यांच्या आरोपांना प्रत्युत्तर देण्याची वेळ त्यांच्यावर आली. त्यानंतर भाजपने निवडणुकीची रणनीती बदलली. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जाहीरसभा घेऊन अजित पवार यांना रोखण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर उमेदवारी डावलल्याने नाराज झालेल्या इच्छुकांशी संपर्क साधून त्या प्रत्येकाला जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे नाराजही कामाला लागल्याने चित्र बदलले.

### पिंपरी-चिंचवडही पुन्हा भाजपकडे

» पुण्याप्रमाणे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये प्रचाराचा धुरळा उडवला. अजित पवार आणि भोसरीचे भाजपचे आमदार महेश लांडगे यांच्यात 'अरे तुरे'पर्यंत वाद झाले. एकेकाळचा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला ताब्यात घेण्यासाठी अजित पवार यांनी आटोकाट प्रयत्न केले. मात्र, त्यामध्ये त्यांना यश आले नाही. भाजपने या महापालिकेवरील सत्ता कायम राखली. अन्य पक्षांचा निभाव लागला नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पुणे निकालानंतर अजित पवार थेट शरद पवारांच्या भेटीला; पुन्हा राजकीय भूकंपाचे संकेत?

## पुणेकरांनी पुन्हा एकदा भाजपचे कमळ शहरात फुलवत भाजपला संधी दिली आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीचा निकाल हाती आल्यानंतर पुणेकरांनी पुन्हा एकदा भाजपचे कमळ शहरात फुलवत भाजपला संधी दिली आहे. यातच आता सत्ताधारी महायुतीचे नेतृत्व करणाऱ्या भाजपचे राजकीय स्थान आणखी भक्कम बनले आहे. मात्र निकालानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या भेटीसाठी बारामतीतील त्यांच्या 'गोविंदबाग' या निवासस्थानी दाखल झाले आहेत.

पुण्यातील धक्कादायक निकालानंतर दोन्ही नेत्यांमध्ये होणारी ही पहिलीच भेट आहे. ही भेट कौटुंबिक नसून यामागे काही मोठे राजकीय संकेत दडलेले आहेत का? असा सवाल आता केला जात आहे.

महायुतीतील मित्र पक्ष असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी यांच्यातच लढत असल्याचे चित्र निर्माण झाले. त्यातच अजित पवारांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सोबत घेत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये एकत्र निवडणूक लढवली. मात्र दोन्ही ठिकाणी राष्ट्रवादीला अपेक्षित असे यश मिळवता आले नाही.

या भेटीदरम्यान राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या भविष्यातील वाटचालीवर किंवा महापालिकेत मिळून विरोधी पक्ष म्हणून काम करण्यावर चर्चा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यातच आता अजित पवार आणि शरद पवार पक्ष एकत्र येण्याची देखील शक्यता आहे. यावेळी सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे देखील उपस्थित आहेत.

तसेच राज्यात आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका आहेत. यामुळे भाजपला टक्कर द्यायची असेल, अस्तित्व टिकवायचे असेल तर दोन्ही पक्षांना एकत्र येण्याशिवाय पर्याय राहिलेला नसल्याची चर्चा देखील आता रंगली आहे.

### राष्ट्रवादीला अपेक्षित यश नाही

» दरम्यान, महापालिका निवडणुकीची घोषणा झाल्यापासून शहरात राजकीय गोंधळाचे वातावरण दिसत होते. महायुतीतील मित्र पक्ष असलेल्या भाजप आणि राष्ट्रवादी यांच्यातच लढत असल्याचे चित्र निर्माण झाले. त्यातच अजित पवारांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सोबत घेत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये एकत्र निवडणूक लढवली. मात्र दोन्ही ठिकाणी राष्ट्रवादीला अपेक्षित असे यश मिळवता आले नाही.

# शिरूरच्या 'बेट' भागात जिल्हा परिषदेसाठी 'पंचरंगी' लढतीचे संकेत

## कवठे येमाई – टाकळी हाजी गटात राजकीय चुरस वाढली

**पुणे | प्रतिनिधी**

महानगरपालिका निवडणुकांच्या धामधुमीनंतर आता पुणे जिल्ह्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. विशेषतः शिरूर तालुक्यातील कवठे येमाई – टाकळी हाजी या जिल्हा परिषद गटाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, येथे अटीतटीची पंचरंगी लढत होण्याचे संकेत मिळत आहेत. अनेक इच्छुकांनी आपापल्या पक्षांकडे उमेदवारीची मागणी करत आतापासूनच प्रचाराचा धडाका लावला आहे.

या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून माजी आमदार पोपटराव गावडे यांचे सुपुत्र राजेंद्र गावडे यांनी जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. गेल्या ६० वर्षांचा वारसा आणि मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या माध्यमातून झालेली विकासकामे यांच्या जोरावर ते निवडणुकीला सामोरे जात आहेत. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडून दामू घोडे यांनीही कंबर कसली असून, त्यांनी जनसंपर्कावर भर दिला आहे.



### विकासाचा मुद्दा की वैयक्तिक संपर्क?

» राजेंद्र गावडे यांनी कोट्यवधींच्या निधीचा दावा केला असतानाच, डॉ. सुभाष पोकळे आणि दामू घोडे यांनी सर्वसामान्यांशी असलेली नाळ आणि सामाजिक कार्याचा आधार घेतला आहे. बैलगाडा शर्यती, क्रीडा स्पर्धा आणि वैयक्तिक मदतीमुळे मतदार आपल्यालाच कौल देतील, असा विश्वास या नेत्यांना वाटतोय. एकूणच, प्रस्थापित नेतृत्व विरुद्ध नवीन चेहरा असा संघर्ष या पंचरंगी लढतीत पाहायला मिळणार असून, शिरूरच्या 'बेट' भागाचा 'विजयाचा गुलाल' कोण उधळणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

### मातब्बर नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

» भारतीय जनता पार्टीकडून ज्येष्ठ नेत्या सावित्रा थोरात या रिंगणात उतरण्याची शक्यता असल्याने भाजपची ताकद कोणाच्या पारड्यात पडणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. दरम्यान, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे समर्थक आणि माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे यांची भूमिका अद्याप गुलदस्त्यात आहे. पोकळे यांचा निर्णय या भागातील राजकारणाची गणिते फिरवू शकतो.

### 'मशाल' पेटणार? नव्या नेतृत्वाचा उदय

» शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षामध्ये उद्योजक बाळासाहेब डांगे यांच्या प्रवेशाने नवा उत्साह संचारला आहे. "३५ वर्षे निष्ठा ठेवूनही संधी मिळाली नाही, त्यामुळे आता जनतेच्या आग्रहास्तव घराणेशाहीविरुद्ध निवडणूक लढवत आहे," असा पवित्रा डांगे यांनी घेतला आहे. युवकांची मोठी फळी त्यांच्या पाठीशी उभी राहत असल्याने उबाठा गटाची ताकद वाढल्याचे चित्र आहे.

भारतीय जनता पार्टीकडून ज्येष्ठ नेत्या सावित्रा थोरात या रिंगणात उतरण्याची शक्यता असल्याने भाजपची ताकद कोणाच्या पारड्यात पडणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. दरम्यान, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे समर्थक आणि माजी पंचायत समिती सदस्य डॉ. सुभाष पोकळे यांची भूमिका अद्याप गुलदस्त्यात आहे. पोकळे यांचा निर्णय या भागातील राजकारणाची गणिते फिरवू शकतो.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षामध्ये उद्योजक बाळासाहेब डांगे यांच्या प्रवेशाने नवा उत्साह संचारला आहे. "३५ वर्षे निष्ठा ठेवूनही संधी मिळाली नाही, त्यामुळे आता जनतेच्या आग्रहास्तव घराणेशाहीविरुद्ध निवडणूक लढवत आहे," असा पवित्रा डांगे यांनी घेतला आहे. युवकांची मोठी फळी त्यांच्या पाठीशी उभी राहत असल्याने उबाठा गटाची ताकद वाढल्याचे चित्र आहे.

राजेंद्र गावडे यांनी कोट्यवधींच्या निधीचा दावा केला असतानाच, डॉ. सुभाष पोकळे आणि दामू घोडे यांनी सर्वसामान्यांशी असलेली नाळ आणि सामाजिक कार्याचा आधार घेतला आहे. बैलगाडा शर्यती, क्रीडा स्पर्धा आणि वैयक्तिक मदतीमुळे मतदार आपल्यालाच कौल देतील, असा विश्वास या नेत्यांना वाटतोय.

एकूणच, प्रस्थापित नेतृत्व विरुद्ध नवीन चेहरा असा संघर्ष या पंचरंगी लढतीत पाहायला मिळणार असून, शिरूरच्या 'बेट' भागाचा 'विजयाचा गुलाल' कोण उधळणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# जुन्नरमध्ये 44 हजार नव्या मतदारांची एन्ट्री! 'या' एका आकड्यामुळे बदलणार गट-गणांचे गणित

## महिला आणि नवमतदारांचे वर्चस्व वाढले; जुन्नर तहसील कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या अंतिम मतदार यादीमुळे इच्छुकांची धाकधूक वाढली.

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यात आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीआधीच राजकीय समीकरणे बदलण्याचे संकेत मिळत असून, तब्बल ४४ हजार नव्या मतदारांची भर पडल्याने सर्वच पक्षांचे गणित नव्याने मांडले जाणार आहे. जुन्नर तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाने जाहीर केलेल्या अंतिम मतदार यादीमुळे तालुक्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे.

२०१७ च्या निवडणुकीत एकूण २ लाख ६३ हजार २०९ मतदार होते. त्या तुलनेत यावेळी तब्बल ४४ हजार १४ मतदारांची वाढ झाल्याने 'जुने मतदार विरुद्ध नवे मतदार' असे समीकरण निर्माण झाले आहे. स्थलांतर, नवमतदार, महिला मतदारांचे वाढते प्रमाण यामुळे कोणाचे पारडे जड होणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.



### मतदारसंख्येत लक्षणीय वाढ

» नगरपरिषद क्षेत्र वगळता तालुक्यातील आठ जिल्हा परिषद गट व सोळा पंचायत समिती गणांमध्ये आता एकूण ३ लाख ७ हजार २२३ मतदार आहेत. यामध्ये महिला मतदारांची संख्या १ लाख ५१ हजार ३५५ असून ती पुरुष मतदारांपेक्षा लक्षणीय ठरली आहे. पुरुष मतदार १ लाख ५५ हजार ८३३, तर इतर मतदार ५ असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुनील शेळके यांनी दिली.

यावेळी एक गट व दोन गण वाढल्याने जिल्हा परिषद सदस्यांची संख्या आठ, तर पंचायत समिती सदस्यांची संख्या सोळा झाली आहे. त्यामुळे उमेदवारांची संख्या वाढणारच, पण पक्षांतर्गत स्पर्धाही अधिक तीव्र होणार आहे. आठ गटांपैकी बारव-पाडळी गटात सर्वाधिक ४१ हजार ३०२ मतदार असल्याने हा गट निवडणुकीचा केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे. त्याखालोखाल आळे-पिंपळवंडी, डिंगोरे-उदापूर, बेल्हे-राजुरी हे गटही निर्णायक ठरू शकतात.

तालुक्यात महिला मतदारांचे प्रमाण वाढल्याने यावेळी विकास, पाणी, आरोग्य, शिक्षण, रस्ते, महिला सक्षमीकरण असे मुद्दे निर्णायक ठरणार असल्याचे जाणकारांचे मत आहे. त्यामुळे 'मतदारसंख्या वाढ' ही केवळ आकडेवारी न राहता, जुन्नरच्या सत्तासमीकरणात मोठा ट्विस्ट देणारी ठरणार आहे. ४४ हजार नव्या मतदारांचा कौल कुणाच्या बाजूने झुकणार? याचे उत्तर निवडणुकीच्या रणधुमाळीतच स्पष्ट होणार आहे.